**<u>तातडीचे/हस्ते बटवडा</u>**

# <u>मुंबई विद्यापीठ</u>

Publication/ECC/2012-13/1
कक्ष क्र. २२१,
मुंबई – ४०० ०३२.
दिनांक :– ११ एप्रिल २०१२.

<u>विद्यापीठ विभागांचे संचालक आणि विभाग प्रमुख,</u>

**विषय : विद्यापीठाचे वर्षवृत्त १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२
या कालावधीतील माहितीचे संकलन.**

महोदय/महोदया,

१) **आपल्याकडून आवश्यक असलेला विभागाचा अहवाल महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग पत्र क्रमांक विवाअ २०१०(२१५/१०)/विशा.३, दिनांक २५ ऑगस्ट २०१० प्रमाणे मराठीचे इंग्रजी व इंग्रजीचे मराठी मध्ये भाषांतरित करून द्यावयाचे आहे. सदर माहिती 'मराठी' व 'इंग्रजी' या दोन्ही भाषांमध्ये देणे बंधनकारक आहे.** ज्या विभागाकडून दोन्ही भाषांमध्ये माहिती पुरविली जाणार नाही त्याला संबंधित विभागाचे प्रमुख जबाबदार राहातील याची नोंद घ्यावी.

२) आपणांस कळविण्यात येते की, **२०११–१२** या वर्षाकरिता विद्यापीठाचे वर्षवृत्त तयार करण्याचे काम सुरू झाले आहे.

३) वर्षवृत्त मराठी आणि इंग्रजीमध्ये तयार केले जाणार आहे.

४) सोबत जोडलेल्या नमुनापत्र क्र.१ नुसार आपण आपल्या विभागाशी संबंधित असणारी सर्वसाधारण स्वरूपाची माहिती मराठी आणि इंग्रजीमध्ये भाषांतरित करून पाठवावयाची आहे.

५) माहिती **दिनांक १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२** या काळातील असावी.

६) ज्या माहितीचा समावेश आजवर आपण वर्षवृत्ताच्या विविध परिशिष्टात करीत आलो आहोत, जी माहिती महाराष्ट्राबाहेरील वा परदेशातील विद्यापीठांशी संपर्क ठेवण्याच्या दृष्टीने महत्त्वाची असते ती मात्र इंग्रजी व मराठीत वर्षवृत्ताच्या परिशिष्टात दिली जाणार आहे. या परिशिष्टात बरीचशी आकडेवारी असते ती ही इंग्रजी व मराठीत दिली जाईल. ही माहिती सोबत जोडलेल्या नमुनापत्र क्र. २ मध्ये भरून पाठवावयाची आहे.

७) माहितीशी संबंधित असणा—या घटनांची छायाचित्रे असल्यास पाठवावीत. छायाचित्रे पाठविताना घटनांचा तपशील छायाचित्रांच्या मागील बाजूस पेनांनी किंवा पेन्सिलने न लिहिता तो वेगळ्य कागदावर टंकलिखित करून तो कागद छायाचित्राच्या मागील बाजूस चिकटवावा. छायाचित्रास स्टेपलपीन मारू नये, अन्यथा छायाचित्रे स्विकारली जाणार नाहीत. माहिती लिहिताना छायाचित्रामध्ये ज्या मान्यवर व्यक्ती आहेत त्यांचे नाव व हुद्दा, आयोजकाचे नाव, ठिकाण, तारीख इत्यादीबद्दल थोडक्यात माहिती द्यावी.

८) मराठीतून माहिती पाठविताना काही इंग्रजी शब्दांना योग्य मराठी पर्यायी शब्द उपलब्ध नसतील तर त्या ठिकाणी आपण मूळचे इंग्रजी शब्द तसेच ठेवावेत.

९) मराठी व इंग्रजी मधील माहितीची सीडी बनवून त्याची एक **Soft Copy** व एक **Hard Copy** पाठवावयाची आहे.

१०) वर्षवृत्त हे मराठी व इंग्रजीत प्रकाशित केले जाते, त्यामुळे मराठी व इंग्रजीतील माहिती पुरविणे सक्तीचे आहे. मराठी व इंग्रजी माहितीमध्ये विभाग प्रमुखांच्या नावासह सर्व शिक्षकांची नावे कळवावीत.

११) कृपया माहिती **दिनांक ३१ मे २०१२** पूर्वी मराठी आणि इंग्रजीमधून भाषांतरित करून प्रत्येकी दोन प्रतींमध्ये व सीडीमध्ये **(अधीक्षक, प्रकाशन विभाग, मुंबई विद्यापीठ, दुसरा मजला, रुम नं. २२१, फोर्ट)** येथे पोहोचेल अशा बेताने पाठवावी.

१२) वर्षवृत्ताचा मसुदा व्यवस्थापन परिषदेपुढे विचारार्थ ठेवणे आवश्यक असते म्हणून हे पत्र अत्यंत तातडीचे समजावे.

१३) मराठीतील माहिती **संस्कृत व कृतीदेव १० व २१ फॉन्ट** मध्ये पाठवावी. तसेच इतर फॉन्ट असल्यास कॉपी करून पाठवावा.

१२) वर्षवृत्त माहितीबाबतचे परिपत्रक व वरील दिलेले फॉन्ट हे **www.mu.ac.in** या विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

आपला विश्वासू,

Sd/-
नियंत्रक,
मुद्रण व लेखन सामुग्री

सहपत्रे : दोन

नमुनापत्र क्र.१

# मुंबई विद्यापीठ

## विद्यापीठाच्या २०११–१२च्या वर्षवृत्तात अंतर्भूत करण्याची विद्यापीठ विभागासंबंधी मराठी आणि इंग्रजीमधून पाठवावयाची सर्वसाधारण माहिती
## (कालावधी : १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२)

---

**प्रास्ताविक :**

**वर्षवृत्त प्रसिद्ध करण्याचे हेतू पुढीलप्रमाणे आहेत :**

(अ) अहवाल वर्षात घडलेल्या शैक्षणिकदृष्ट्या महत्त्वाच्या घटनांची नोंद करणे.

(ब) अभ्यासक्रमाशिवाय इतर क्षेत्रातील महत्त्वाच्या कार्यक्रमांचे टिपण करणे आणि त्यातील यशापयशांची नोंद करणे.

(क) विद्यापीठाच्या प्रशासनामध्ये जे बदल झाले असतील आणि प्रशासनाद्वारे जे महत्त्वाचे निर्णय घेतले असतील त्यांची नोंद करणे.

**विद्यापीठाच्या वरील कालावधीतील अहवालाचा यंदाच्या वर्षवृत्तात अंतर्भाव करावयाचा आहे. त्यासाठी आपल्या विभागाकडून पुढे दिलेल्या क्रमानुसार माहिती कळवावी :–**

१) विद्यापीठ विभागाचे विशेष कार्य :–

अ) ज्ञानक्षेत्रात लक्षणीय भर घालणारे,

ब) समाजाच्या सामाजिक, आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाचे असणारे कार्य वा घटना,

क) विभागाने नव्याने हाती घेतलेले संशोधन प्रकल्प.

२) विभागाने आयोजित केलेली चर्चासत्रे, कार्यशाळा वगैरे :–

अ) प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आयोजित केलेली चर्चासत्रे, कार्यशाळा (ही माहिती देताना विषय, निबंधवाचन आणि शक्य असल्यास त्या कार्यक्रमाची काही वैशिष्टये नोंदवावी).

ब) परिषदा, व्याख्याने, परिसंवाद.

३) अन्य विभागांच्या सहकार्याने आपल्या विभागाने आयोजित केलेले कार्यक्रम.

४) विभागाने आयोजित केलेली स्मृतिव्याख्याने, व्याख्यानमाला (वक्ते, विषय, तारखा इत्यादी माहितीसह).

५) विभागातील शिक्षकांनी केलेली महत्त्वपूर्ण कामगिरी आणि त्यांना इतर विद्यापीठे, संस्था, राज्य आणि केंद्रशासन यांजकडून मिळालेले गुणवत्ता पुरस्कार.

६) विभागाच्या विद्यार्थ्यांनी राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर क्रीडा, वक्तृत्त्वस्पर्धा व अन्य सांस्कृतिक कार्यक्रम यांमध्ये केलेले विशेष उल्लेखनीय कार्य, मिळविलेली पारितोषिके (आयोजक, ठिकाणे, तारीख).

७) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या योजनांचा विभागास झालेला लाभ —

अ) विभागातील शिक्षकांनी इतर विद्यापीठात दिलेली व्याख्याने.
ब) इतर विद्यापीठातील शिक्षकांनी विभागात दिलेली व्याख्याने.

८) विभागातील शिक्षकांनी शैक्षणिक कारणासाठी परदेशास भेट दिलेली असल्यास त्याबाबतची माहिती पुढील पद्धतीने द्यावी — (१) ज्या योजनेखाली भेट दिली असेल ती योजना आणि भेटीचा हेतू. (२) भेट दिलेल्या संस्थेचे नाव व ठिकाण. (३) भेटीचा कालावधी आणि भेटीचे फलित.

९) विभागात व्यक्तिगत तसेच विभागीय संशोधन प्रकल्प चालू असल्यास व त्यांना विद्यापीठ अनुदान मंडळ, आय्.सी.एस्.एस्.आर्. वगैरे संस्थांकडून अनुदान मिळालेले असल्यास त्या प्रकल्पाची माहिती येथे द्यावी. पूर्वी हाती घेतलेल्या प्रकल्पांमध्ये जी प्रगती झाली असेल तिचाही समावेश येथे करावा.

१०) वरील सर्व माहितीच्या अनुषंगाने वर्षवृत्तामध्ये छापण्यासाठी उपयुक्त ठरणारी छायाचित्रे अहवालासोबतच पाठवावीत. तसेच घटनांचा तपशील छायाचित्राच्या मागील बाजूस पेनांनी किंवा पेन्सिलने न लिहिता तो वेगळ्या कागदावर टंकलिखित करून तो कागद छायाचित्राच्या मागील बाजूस चिकटवावा. छायाचित्रास स्टेपलपीन मारु नये, अन्यथा छायाचित्रे स्विकारली जाणार नाहीत. माहिती लिहिताना छायाचित्रामध्ये ज्या मान्यवर व्यक्ती आहेत त्यांचे नाव व हुद्दा, आयोजकाचे नाव, ठिकाण, तारीख इत्यादीबद्दल थोडक्यात माहिती द्यावी.

११) विभागाची उपरोक्त कोणत्याही सदरात येऊ न शकलेली माहिती येथे द्यावी.

वरील माहितीचे लेखन अशाप्रकारे करावे की, विद्यापीठाच्या सर्व घटकांना एकमेकांच्या कार्याचा स्पष्टपणे बोध होईल आणि ज्या घटकांना ह्य माहितीचा उपयोग करून घ्यावयाचा असेल त्यांना तो करून घेता येईल.

———————————————

नमुनापत्र क्र.२

# मुंबई विद्यापीठ

**२०११–१२ या शैक्षणिक वर्षातील वर्षवृत्तामध्ये समाविष्ट करण्यासाठी विभागाची सांख्यिकी माहिती**
**(कालखंड : १ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२)**

१. विद्यापीठाच्या विभागाचे नाव व स्थापना वर्ष :

२. विभाग प्रमुखाचे नाव व शैक्षणिक अर्हता :

३. शिक्षक व संशोधक कर्मचारी (३१ मार्च २०१२) :

| | मान्य पदे | | सध्या कार्यरत असलेले | |
|---|---|---|---|---|
| | पूर्ण वेळ | अर्ध वेळ | पूर्ण वेळ | अर्ध वेळ |
| १. प्राध्यापक | | | | |
| २. प्रपाठक | | | | |
| ३. अधिव्याख्याता | | | | |
| ४. इतर अधिव्याख्याता | | | | |
| ५. संशोधन साहाय्यक | | | | |

४. अजा, अज, भटक्या व विमुक्त :
जातीमधील शिक्षक (३१ मार्च २०१२)

| | अनुसूचित जाती | अनुसूचित जमाती | भटक्या व विमुक्त जाती |
|---|---|---|---|
| १. प्राध्यापक | –– | –– | –– |
| २. प्रपाठक | –– | –– | –– |
| ३. अधिव्याख्याता | –– | –– | –– |
| ४. संशोधन साहाय्यक | –– | –– | –– |

५. २०११–१२ या शैक्षणिक वर्षात प्रवेश :
घेतलेले विद्यार्थी

| अभ्यासक्रम | पुरुष विद्यार्थी संख्या | महिला विद्यार्थी संख्या | एकूण |
|---|---|---|---|
| एम.ए. भाग १ | –– | –– | –– |
| एम.ए. भाग २ | –– | –– | –– |
| एम.फिल. | –– | –– | –– |
| पीएच.डी. | –– | –– | –– |
| प्रमाणपत्र अभ्यासक्रम | –– | –– | –– |
| पदविका अभ्यासक्रम | –– | –– | –– |
| मुद्रितशोधन व संपादन | –– | –– | –– |
| कौशल्य अभ्यासक्रम | –– | –– | –– |

६. २०११–१२ या शैक्षणिक वर्षात प्रवेश घेतलेले अजा, अज व भटक्या आणि विमुक्त जातीमधील विद्यार्थी :

| | पुरुष | महिला | एकूण |
|---|---|---|---|
| **अनुसूचित जाती** | —— | —— | —— |
| **अनुसूचित जमाती** | —— | —— | —— |
| **भटक्या व विमुक्त जाती** | —— | —— | —— |
| **इतर मागासवर्गीय** | —— | —— | —— |

७. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या :

| एम.ए. | एम.फिल. | पीएच.डी. |
|---|---|---|
| —— | —— | —— |

८. अध्यापकाचे प्रकाशित पुस्तके, शोधनिबंध आणि लेख (१ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ या कालावधीत प्रकाशित झालेल्या लेखाचा समावेश करावा. वर्तमानपत्रे, मासिके आणि विद्यार्थ्यांच्या संशोधक पदवीसाठी आवश्यक ते लेख व शोधनिबंध आणि प्रकाशनाच्या प्रक्रियेत असलेल्या लेखांचा समावेश करु नये. :

**अध्यापकाचे नाव** **प्रकाशन**

– सर्वात जुने शीर्षक अवतरणचिन्हात

– सहलेखन करणा–या व्यक्तीचे नाव

– नियतकालिकाचे नाव (प्रकाशक अधोरेखित)

– खंड क्र., पृष्ठ क्र.

– नियतकालिकाचे प्रकाशन वर्ष, दिनांक कंसात

९. दिनांक ०१ एप्रिल २०११ ते ३१ मार्च २०१२ या कालावधीत विभागीय, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय महत्त्वाची चर्चासत्र, परिषदा/परिसंवादांमधील शिक्षकांचा सहभाग आणि त्या कार्यक्रमांमध्ये त्यांनी सादर केलेले शोधनिबंध. :

(सूचना : शिक्षकांनी जे शोधनिबंध सादर केले असतील आणि ते परिसंवाद/परिषदा/चर्चाचत्रांच्या कार्यक्रमात समाविष्ट करण्यात आले असतील तरच माहिती द्यावी.)

| **शिक्षकाचे नाव** | **परिषद/चर्चासत्र/परिसंवादांची संकल्पना** | **आयोजकाचे नाव** | **तारीख आणि स्थळ** | **सदर करण्यात आलेल्या शोधनिबंधाचे चैर्ड्क** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |

——————————————————

**Enclosure to Circular letter-2**

# UNIVERSITY OF MUMBAI

## FORM FOR SUBMISSION OF STATISTICAL INFORMATION RELATING TO THE UNIVERSITY DEPARTMENTS FOR INCLUSION IN THE ANNUAL REPORT OF THE UNIVERSITY FOR THE YEAR 2011-12.
## (Period : 1st April 2011 to 31st March 2012)

1) Name of the University Department & Year of Establishment :

2) Name of the Head of the Department alongwith his Academic Qualifications :

3) Teaching & Research Staff as on 31st March 2012 (Note: Please mention number only) :

| | Sanctioned Staff | | Staff in Position | |
|---|---|---|---|---|
| | Full Time | Part Time | Full Time | Part Time |
| i) Professor | | | | |
| ii) Reader | | | | |
| iii) Lecturer | | | | |
| iv) Research Associate | | | | |
| v) Others (Please specify the designation) | | | | |

4) Number of teachers belonging to SC, ST, DT & NT, as on 31st March 2012. :

| | Scheduled Castes | | Scheduled Tribes | | Donotified & Nomadic Tribes | |
|---|---|---|---|---|---|---|
| | Male | Female | Male | Female | Male | Female |
| 1) Professor | | | | | | |
| 2) Reader | | | | | | |
| 3) Lecturer | | | | | | |
| 4) Research Associate | | | | | | |
| 5) Others | | | | | | |

5) Students Enrollment (Please give the Number of students who were enrolled During the academic year 2011-2012. :

| Courses | No.of male Students | No.of female Students | Total |
|---|---|---|---|
| a) M.A/M.Com./ MCJ/MTA Part I | | | |
| b) M.A/M.Com./MCJ/ MTA Part II | | | |
| c) M.Sc. Part I | | | |
| d) M.Sc. Part II | | | |
| e) Master's Degree (By Research) | | | |
| f) M.Phill. | | | |
| g) Ph.D. | | | |
| h) Others | | | |
| | --------------- | --------------- | --------- |
| **Total** | | | |
| | ========= | ========= | ===== |

6) Number of Students belonging to SC, ST, DT & NT (Please give the number of students belonging to backward classes during the academic year 2011-12. (Please do not include the number of EBC students) :

| | Male | Femal | Total |
|---|---|---|---|
| Scheduled Castes | | | |
| Scheduled Tribes | | | |
| Denotified Tribes & Nomadic Tribes | | | |

7) No. of Strudents qualified of (Please mention number only) Master's Degree (By Research) M.Phill Ph.D.

8) Books/Research Papers & Articles published by Teachers : (Please enclose separate sheet)

(Information pertaining to publications of teachers in standard professional Journals during the period from 1st April 2011 to 31st March 2012 is to be included in the Report. Articles Book reviews published by them in Newspapers, periodicals and souveniers/Magazines and the work done by students Working for research degrees under their Guidance as well as papers and articles Forwarded for publications or accepted for publication or under print should not' Be included in the Report).

| **Name of the Teacher** | **Publication** |
|---|---|
| | The order should be<br>-Title of the paper should be given in the inverted commas;<br><br>-Name of the co-Author, if any;<br><br>-Name of the Journal wherein Published (to be underlined);<br><br>-Volume No; page references;<br><br>-The date/year of publications of the journal within circular brackets. |
| e.g. Dr. K.P. Deodhar<br>S.P. Pandit & C.P. Shroff, | :"Angiolymphiod Hyderwith Ensino-philia of Scalp Case Report", Journal of post graduate Medicine, vol.29, pp.113-119 (1983). |

9) Participation by Teachers in Seminars Conferences/Symposia of Regional/ National/International importance & Presentation of paper thereat during The period from 1st April 2011 to 31st March 2012. : (Please enclose separate sheet)

(Note : Information should be furnished only if teachers have presented papers and included in the precedings of the Seminars/Conferences/Symposia as the case may be).

| Name of the Teacher | Theme of the Seminar Conference/Symposia (Please specify whether it was a Seminar/ Conference/Symposia As the case may be). | Name of the Organiser | Date and place | Title of Teacher Paper Presented/ Read |
|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 |